क्रमांक : ७६

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**मंगळवार, दिनांक १९ मे, २०२६/वैशाख २९, शके १९४८**

७६. सर्व सन्माननीय सदस्यांना याद्वारे कळविण्यात येते की, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. संजय मेश्राम प्रतिनिधीत्व करीत असलेल्या उमरेड विधानसभा मतदारसंघामध्ये उमरेड शहरात (MRIDC) मार्फत राबविण्यात येणाऱ्या रेल्वे विकासकामांमध्ये अत्यंत निकृष्ट दर्जा, गंभीर अनियमितता व सार्वजनिक सुरक्षिततेला धोका निर्माण झाल्याबाबत सन्माननीय सदस्यांनी वेळोवेळी अधिकृत निवेदने व तक्रारी संबंधित यंत्रणांकडे सादर केल्या असता त्यांच्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले तरोच सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात श्री. राजेश कुमार जयस्वाल, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड, महारेल (MRIDC) यांचेशी अनेकदा संपर्क साधला असता त्यांनी सन्माननीय सदस्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही तसेच त्यांना अनेकदा मोबाईल वरून संपर्क केला असता त्यालाही कोणताही प्रतिसाद न दिल्याने सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. संजय मेश्राम यांनी श्री. राजेश कुमार जयस्वाल, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड महारेल (MRIDC) यांच्याविरुध्द दिनांक १७ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेली विशेषाधिकार भंग व अवमानाची सूचना मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम २८४ मधील तरतूदींच्या अधीनतेने स्वेच्छानिर्णयाने विधानसभा विशेषाधिकार समितीकडे तपासणीसाठी व अहवाल सादर करण्यासाठी दिनांक १५ मे, २०२६ रोजी सुपूर्द केली आहे.

---

**जितेंद्र भोळे,**<br>
सचिव -१.<br>
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**विधान भवन,**<br>
मुंबई.<br>
दिनांक : १९ मे, २०२६

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व मा.सदस्य.<br>
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव<br>
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी<br>
४) विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये<br>
५) संगणक कक्ष<br>
६) MKCL कक्ष